# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट २९८ - २३** **दिनांक : - ०४/०९/२०२३**

## बोलण्यात गुंतवून हातचालाखीने फसवणुक करणा-या सराईत आरोपीतांस ताब्यात घेण्यास गुन्हे शाखा कक्ष -3 विरार यांना यश

दिनांक १९/०८/२०२३ रोजी सकाळी ११.३० वा. चे सुमारास साईबाबा मंदिर समोर फुलपाडा विरार पुर्व ता.वसई जि.पालघर येथे दोन अनोळखी आरोपीत यांनी आपसात सगंणमत करुन फिर्यादी वय- ६५ वर्षे व्यवसाय - सेवानिवृत्त, यांना बोलले कि, “तुम्ही चहा पिता का” असे विचारुन त्यातील एक इसम फिर्यादीच्या पाया पडु लागला त्यावेळी फिर्यादी त्यांस बोललो की तुम्ही कोण आहे मी तुम्हाला ओळखत नाही तेव्हा ते फिर्यादीच्या खिशात हात घालुन त्यातील एकाने फिर्यादीच्या गळयातील सोन्याची चैन काढुन घेवुन फिर्यादीची फसवणूक केली म्हणुन विरार पोलीस ठाणे गुन्हा रजि नंबर ८१४/२०२३ भा.द.वी.सं.कलम ४२०, ३४ प्रमाणे गुन्हा नोंद आहे.

मिरा भाईदर वसई विरार पोलीस आयुक्तालय परिसरात गेल्या काही महिण्यापासुन बतावणी/ फसवणुकीचे प्रकारात वाढ झाल्याने सदर घटनांची मा. वरिष्ठांनी गांभिर्याने दखल घेवुन आरोपीत यांचा शोध घेवुन पायबंद करणे बाबत सुचना दिल्या होत्या

सदर गुन्हे अनुषंगाने मा. पोलीस उप आयुक्त गुन्हे, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे यांनी दिलेल्या सुचना व आदेशान्वये सदर गुन्हयाचा तपास गुन्हे शाखा कक्ष -३ कडे देण्यात आला. गुन्हयाचा तांत्रीक विश्लेषण व गुप्त बातमीदार यांचेकडून माहिती प्राप्त करुन आरोपीत नामे – १) रमेश ऊर्फ रम्या विजयकुमार जैसवाल, वय ४६ वर्षे, रा., म्हाडा कॉलनी, वाशी नाका, चेंबूर, मुंबई-७४, २) विशाल ऊर्फ बल्ला ऊर्फ बाळू विष्णू कश्यप, वय २८ वर्षे, रा. सायन माहिम लींक रोड, धारावी ब्रीजच्या वर, धारावी, मुंबई. यांना ताब्यात घेवुन त्यांचेकडे तपास केला असता त्यांचा सदर गुन्हयात सहभाग निष्पन्न झाल्याने त्यांना सदर गुन्हात दिनांक २६/०८/२०२३ रोजी अटक करुन नमुद आरोपीत यांचे कडे पोलीस कोठडीत दरम्यान आरोपीत यांचे कडुन फसवणुक केलेले १०,००,००० /- रुपये किंमतीचे १६६ ग्रॅम सोन्याचे दागीने व इतर मुद्देमाल हस्तगत करण्यात आले असुन मि.भा.व.वि. पोलीस आयुक्तालय, मुंबई शहर पोलीस आयुक्तालय, ठाणे शहर पोलीस आयुक्तालयातील ८ गुन्हे उघडकीस आले आहेत.

**-उघडकीस आलेले गुन्हे -**

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गुन्हा रजि नंबर व कलम |
|---|---|---|
| १ | विरार पोलीस ठाणे | ८१४/२०२३,भा.द.वि. कलम ४२०, ३४ (मुळ गुन्हा ) |
| २ | माणिकपुर पोलीस ठाणे | ३२६/२०२३, भा.द.वि. कलम ४२०, ३४ |
| ३ | मध्यवर्ती पोलीस ठाणे (ठाणे शहर) | ४८८/२०२३, भा.द.वि.सं. कलम ४२०, ३४ |
| ४ | महात्मा फुले पोलीस ठाणे (ठाणे शहर) | ४७०/२०२३, भा.द.वि.सं. कलम ४२०, ३४ |
| ५ | महात्मा फुले पोलीस ठाणे (ठाणे शहर) | ४५२/२०२३, भा.द.वि.सं. कलम ४२०, ३४ |
| ६ | बोरीवली पोलीस ठाणे (मुंबई रेल्वे) | १०४१/२०२३ भा.द.वी.सं. कलम ४२०, ३४ |

| | | |
|---|---|---|
| ७ | मालाड पोलीस ठाणे (मुंबई शहर) | ४८२/२०२३ भा.द.वी.सं. कलम ४२० , ३४ |
| ८ | दिंडोशी पोलीस ठाणे (मुंबई शहर) | ४८२/२०२३ भा.द.वी.सं. कलम ४२० , ३४ |

नमुद आरोपीत यांचा पुर्व इतिहास पडताळुन पाहता उक्त आरोपीत विरुध्द अशाच प्रकारे मुंबई, ठाणे शहर, मिरा भाईंदर- वसई विरार आयुक्तालय येथे ५० पेक्षा जास्त गुन्हे नोंद असुन नमुद आरोपीत हे विरार पोलीस ठाणे गुन्हा रजि नंबर ८१४/२०२३ भा.द.वी.सं. कलम ४२०, ३४ या गुन्हयाचे पोलीस कोठडी मध्ये आहे.

वरील कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त साो., (गुन्हे), श्री. अमोल मांडवे सहा.पोलीस आयुक्त साो., (गुन्हे) मि.भा.वि.व पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक प्रमोद बडाख, पो.उप.निरी. अभिजित टेलर, उमेश भागवत, पो.हवा. अशोक पाटील, मनोज चव्हाण, मुकेश तटकरे,सचिन घेरे, सागर बारवकर, मनोज सकपाळ, अश्विन पाटील, पो.अं. राकेश पवार, सुमित जाधव, सुनिल पाटील, युवराज वाघमोडे म.सु.ब सागर सोनवणे, प्रविण वानखेडे, गणेश यादव सर्व नेमणुक गुन्हे शाखा कक्ष -३ तसेच स.फौ. संतोष चव्हाण नेम सायबर सेल यांनी पार पाडली आहे.

**----0000----**